# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १४६** **दिनांक ०७/०६/२०२१**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालाच्या कार्यक्षेत्रात कोरोना विषाणुच्या अनुषंगाने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ चे कलम १४४ प्रमाणे निर्गमित केलेले शिथिलता आदेश.**

कोविड-१९ च्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने दि.१२/०५/२०२१ रोजीच्या ''ब्रेक द चैन'' कार्यक्रमाअंतर्गत जारी केलेल्या निर्देशास अनुसरुन मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात कारोना आजार संसर्गाचे पार्श्वभूमीवर फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ चे कलम १४४ प्रमाणे पुढिल शिथिलता नियम लागु करण्यात आले आहेत.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात दिनांक १४/०४/२०२१, दिनांक २२/०४/२०२१, दिनांक ३०/०४/२०२१, दिनांक १४/०५/२०२१ व दिनांक ०१/०६/२०२१ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या मनाई आदेशामध्ये खालील अतिरीक्त निर्बंधांचा समावेश केला असुन सदरचा मनाई आदेश अतिरिक्त निर्बंधासह दिनांक ०७/०६/२०२१ रोजीचे सकाळी ०७.०० वा. पासुन लागु राहतील याबाबत आदेशित केले आहे.

**शासनाने निर्गमित केलेल्या दिनांक ०४/०६/२०२१ रोजीच्या आदेशास अनुसरुन व मा.जिल्हाधिकारी ठाणे यांचे दि.०५/०६/२०२१ रोजीचे पत्रानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात पुढीलप्रमाणे शिथिलता नियम लागू करण्यात आले आहेत.**

१. सर्व अत्यावश्यक सेवांची दुकाने सायं. १६.०० वाजे पर्यंत सुरु राहतील.
२. अत्यावश्यक सेवेशी निगडीत नसणाऱ्या आस्थापना व दुकाने सोमवार ते शुक्रवार सायं. १६.०० वाजे पर्यंत व आठवडया अंती (शनिवार व रविवार) अशी दुकाने बंद राहतील.
३. मॉल/सिनेमागृहे/ नाटयगृहे आठवडयातील सर्व दिवस बंद राहतील.
४. उपहारगृहे/ हॉटेल्स्/रेस्टॉरन्ट हे सोमवार ते शुक्रवार सायं. १६.०० वाजे पर्यंत हॉटेलच्या बैठकीच्या क्षमतेच्या ५० टक्के क्षमते एवढया ग्राहकांना जेवता येईल या प्रमाणात सुरु राहतील व आठवडया अंती (शनिवार व रविवार) केवळ पार्सल/टेक अवे आणि होम डिलेवरी सुविधा सुरु राहतील.
५. उपनगरीय लोकल वाहतूकीबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने निर्गमित केलेले आदेश लागू राहतील.
६. सार्वजनिक ठिकाणे / खेळाची मैदाने / वॉकिंग ट्रॅक/ सायकलींग इत्यादींच्या वापरा करीता दररोज सकाळी ०५.०० वा. ते सकाळी ०९.०० वाजे पावेतो परवानगी असेल.
७. खाजगी कार्यालये हे सोमवार ते शुक्रवार सायं. १६.०० वाजे पावेतो सुरु राहतील. (ज्या कार्यालयांना सुट देण्यात आलेली आहे ती खाजगी कार्यालये वगळुन)
८. कार्यालयीन उपस्थिती शासकीय तथा खाजगी (सुट देण्यात आलेली) कार्यालये ही ५० टक्के क्षमते एवढी असावी.
९. क्रिडा-सकाळी ०५.००वा. पासुन सकाळी ०९.०० वा./ सायं. ०६.०० वा. पासून सायं.०९.०० पर्यंत फक्त मैदानी खेळांना परवानगी राहील.
१०. चित्रीकरण Bubble च्या आतमध्ये सायं.०४.०० वा पर्यंत सुरु ठेवता येईल व सायं. ०५.०० वा. नंतर कोणासही हालचाल करता येणार नाही.
११. सामाजिक मेळावे व सांस्कृतीक कार्यक्रम हे सभागृहाच्या ५० टक्के क्षमतेने सोमवार ते शुक्रवार सायं. १६.०० वाजे पर्यंत भरविता येतील.

१२. विवाह समारंभ ५० लोकांच्या उपस्थितीत करण्याची मूभा असेल.

१३. अंत्यविधी २० लोकांच्या उपस्थितीत करण्याची मूभा असेल.

१४. निवडणुकीच्या अनुषंगाने स्थानिक संस्थाच्या / सहकारी संस्थांच्या बैठका ५० टक्के क्षमते इतक्याच उपस्थितीत घेता येतील.

१५. बांधकामाच्या ठिकाणी मजुरांच्या निवासस्थानाची सोय असलेली बांधकामे सुरू राहतील किंवा इतर ठिकाणांहून बांधकामासाठी येणाऱ्या मजुरांना सायं. १६.०० वाजे पर्यंत सोडणे बंधनकारक असेल.

१६. कृषि सेवा दुकाने परवानगी दिलेल्या वेळेत सुरु राहतील.

१७.ई-कॉमर्स सुविधांशी निगडीत सेवा पुर्ण वेळ सुरू राहतील.

१८. दररोज सायं. १७.०० वाजे पर्यंत  जमाव बंदी असेल व सायं. १७.०० वाजे नंतर संचार बंदी असेल.

१९. व्यायाम शाळा/ सलुन/ ब्युटी पार्लर /स्पा /वेलनेस सेंटर दररोज सायं. १६.०० वाजे पर्यंत ५० टक्के एवढया क्षमतेने सुरु राहतील. परंतु ग्राहकांना पुर्वनियोजित वेळ ठरवुनच यावे लागेल. तसेच वातानुकूलन यंत्रणेचा वापर करता येणार नाही.

२०. प्रवासी वाहतुक करणाऱ्या बसेस आसन क्षमतेच्या १०० टक्के क्षमतेने सुरु राहतील. परंतु प्रवाशांना उभे राहुन प्रवास करता येणार नाही.

२१. माल वाहतुक सेवा जास्तीत जास्त ०३ प्रवाशांसह ( चालक, मदतनीस व क्लिनर) यापुर्वी शासनाने घातलेल्या निर्बंधासह सुरू राहतील.

२२. उत्पादन क्षेत्रातील निर्यात क्षेत्राशी निगडीत घटक लघु व मध्यम उद्योग अंतर्भूत करून जे निर्यातीशी निगडीत सर्व अटी शर्तींचे पालन करुन पुर्ण क्षमतेने सुरु राहतील.

२३. उत्पादनाच्या अनुषंगाने:-

१. अत्यावश्यक वस्तुंचे उत्पादन करणारे युनिट (आवश्यक वस्तु आणि कच्चे माल/पॅकेजिंग चे उत्पादन करणारे घटक म्हणुन वर्गीकृत केलेल्या वस्तु व आवश्यक असलेल्या पुरवठयाच्या साखळीसह)

२. सर्व सतत प्रक्रिया सुरु असणारे उद्योग(ज्या युनिट्साठी अशा प्रकारच्या प्रक्रियेचे आवश्यकता असते,ज्या अशा प्रकारच्या स्वरुपाच्या असतात ज्यांना त्वरीत थांबवता येत नाही आणि पुरेशा वेळेशिवाय ते पुन्हा सुरु होवु शकत नाही.)

३. राष्ट्रीय सुरक्षा आणि संरक्षणासाठी महत्वपुर्ण असलेल्या वस्तुंचे उत्पादन.

४. अत्यावश्यक,गंभीर स्वरुपाच्या पायाभुत सेवा,सुविधा देणारे डेटा सेंटर/ क्लाऊड सेवा देणारे प्रदाता /आयटी सेवा नियमीत सुरु राहतील.

**२४.** उत्पादन सेक्टर मधील इतर सर्व उत्पादन युनिट, जे अत्यावश्यक सेवेत समाविष्ट केलेले नाहीत, परंतु निरंतर चालु ठेवणे आवश्यक आहेत, असे युनिट केवळ ५० टक्के कर्मचारी क्षमतेने सुरु राहतील.

**शासनाने निर्गमित केलेल्या दिनांक ०४/०६/२०२१ रोजीच्या आदेशास अनुसरुन व मा.जिल्हाधिकारी पालघर यांचे दि.०६/०६/२०२१ रोजीचे पत्रानुसार वसई-विरार महानगरपालिका कार्यक्षेत्रात मिरा-भाईंदर महानगरपालिका व्यतिरिक्त अधिकचे पुढील शिथिलता नियम लागू करण्यात आले आहेत.**

१. कृषिविषयक विक्री करणारी दुकाने/आस्थापणा सर्व दिवशी सायं. १६.०० वाजेपावेतो सुरु राहतील.

२. माल वाहतुक नियमितपणे सुरु राहील.

३.उत्पादन घटक-निर्यातीशी संबंधीत घटक निर्यात बंधन पुर्ण करण्याची आवश्यकता असलेल्या MSMEs सह नियमित पणे सुरु राहतील.

तसेच मिरा-भाईदर,वसई-विरार महानगरपालिका हदिदमध्ये येण्यास किंवा जाण्यास ई पास ची आवश्यकता लागणार नाही. केवळ शासनाने निर्देशित केल्यानुसार स्तर-०५ मधील भागात प्रवास करण्याकरीता ई पास ची आवश्यकता लागणार आहे

................oooooo...................